दैनिक
# जळगाव प्रहार
लेखणीच्या टोकाला सत्याची धार
संपादक- सदाशिव इंगळे

वर्ष ११ वे | अंक नं.२०० | MAHMAR/2012/44272 | रविवार दि. १७ मे २०२६ | जळगांव | email- dailyjalgaonprahar@gmail.com | पाने ४ | किंमत २ रूपये

### महाराष्ट्राच्या जलक्रांतीचे भगीरथ, आपत्ती व्यवस्थापनाचे 'संकटमोचक' ते जनसामान्यांचे महामेरू:

# ना. गिरीशभाऊ महाजन यांच्या दैदिप्यमान प्रवासाचा महाआलेख

### सिंचनाचे प्रलंबित प्रश्न सोडवून राज्याला सुजलाम्-सुफलाम् करणारे द्रष्टे जलसंपदा मंत्री; संकटाच्या छाताडावर पाय देऊन मदतकार्यात आघाडीवर राहणारे आपत्ती व्यवस्थापन प्रमुख; वाढदिवसाच्या शुभमुहूर्तावर जुन्या,

## एकनिष्ठ आणि तहान-भूक विसरून लढणाऱ्या कार्यकर्त्यांचा भाऊंना आग्रहाचा साद!

**विशेष प्रतिनिधी । जामनेर,**

जळगाव महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षितिजावर स्वतःच्या कर्तृत्वाने, पराक्रमाचे नवे निकष लावणारे आणि अविरत लोकसेवेने अढळ स्थान निर्माण करणारे राज्याचे धडाडीचे जलसंपदा, लाभक्षेत्र विकास, आपत्ती व्यवस्थापन मंत्री ना. श्री. गिरीशभाऊ महाजन यांचा उद्या, १७ मे रोजी जन्मदिवस. त्यानिमित्ताने त्यांच्या अथांग राजकीय कारकिर्दीचा, त्यांनी भूषवलेल्या ऐतिहासिक खात्यांच्या अभूतपूर्व कामगिरीचा आणि त्यांच्या जडणघडणीत स्वतःच्या रक्ताचे पाणी करणाऱ्या, तहान-भूक सोडून लढणाऱ्या जुन्या व निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या भाऊंना आग्रहाचा साद!

एका सामान्य कुटुंबातून येऊन सलग ७ वेळा आमदारकीचा इतिहास रचणारे भाऊ आज महाराष्ट्राचे खऱ्या अर्थाने आधारवड बनले आहेत.

संघर्षाची धगधगती पाऊलवाट आणि राजकीय उदय ना. गिरीशभाऊ महाजन यांच्या नेतृत्वाची जडणघडण ही कोणत्याही वातानुकूलित दालनात झालेली नाही, तर ती जमिनीवरील तीव्र संघर्षातून आणि लोक चळवळीतून झाली आहे. एका अत्यंत सामान्य शेतकरी आणि कष्टकरी कुटुंबात जन्मलेल्या भाऊंना राजकारणाचा कोणताही वारसा नव्हता. तरुण वयातच कॉलेज जीवनामध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (ABVP) माध्यमातून त्यांनी अन्यायविरुद्ध आवाज उठवण्यास सुरुवात केली. सुख-दुःखात धावून जाण्याच्या उपजत स्वभावामुळे ते अल्पावधीतच खान्देशातील तरुणांचे गळ्यातील ताईत बनले.

त्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्षाच्या विचारसरणीशी स्वतःला जोडून घेत त्यांनी गावपातळीवर ग्रामपंचायतीच्या निवडणुकीपासून आपल्या निवडणूक राजकारणाचा श्रीगणेशा केला. ग्रामपंचायत सदस्य, त्यानंतर जामनेर तालुका सहकारी सूत गिरणीचे यशस्वी अध्यक्षपद भूषवत त्यांनी सहकार क्षेत्रात आपल्या कौशल्याची चुणूक दाखवली. पक्षाने त्यांच्यातील धडाडी ओळखून १९९५ मध्ये त्यांनी पहिल्यांदा जामनेर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आणि तिथून महाराष्ट्राच्या राजकारणात एक नवा इतिहास सुरू झाला.

. सलग ७ टर्म विजयाचा जागतिक विक्रम

१९९५ मध्ये पहिल्यांदा विधानसभेवर निवडून गेल्यानंतर गिरीशभाऊंनी मागे वळून पाहिलेच नाही. राजकारणात अनेक लाटा आल्या आणि गेल्या, मोठमोठे प्रस्थापित नेते पराभूत झाले, मात्र जामनेरच्या जनतेने आपल्या या लाडक्या लोकनेत्याला प्रत्येक निवडणुकीत आधीपेक्षाही अधिक मताधिक्याने विजयी केले. १९९५, १९९९, २००४, २००९, २०१४, २०१९ आणि त्यानंतर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतही त्यांनी विजय मिळवून सलग सात वेळा आमदार होण्याचा एक दुर्मिळ आणि ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला आहे. निवडणूक संपली की दुसऱ्याच दिवसापासून ते पुन्हा जनसेवेच्या कामात मग्न होतात, हीच त्यांच्या विजयाची खरी गुरुकिल्ली आहे.

जलसंपदा मंत्री म्हणून महाराष्ट्रात ऐतिहासिक जलक्रांती

महाराष्ट्रासारख्या शेतीप्रधान आणि लहरी पावसावर अवलंबून असलेल्या राज्यात जलसंपदा खाते या महत्त्वाच्या मंत्रालयाची धुरा सांभाळणे हे अत्यंत जबाबदारीचे आणि आव्हानात्मक काम आहे. गिरीशभाऊंनी जलसंपदा मंत्री म्हणून काम करताना सिंचनाचे वर्षानुवर्षे रखडलेले प्रश्न मार्गी लावण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले. खान्देशसह संपूर्ण महाराष्ट्रात रखडलेले सिंचन प्रकल्प, धरणांची कामे, बॅरेजेस आणि कालवे त्यांनी युद्धपातळीवर निधी उपलब्ध करून पूर्णत्वास नेले. शेळगाव बॅरेज, वाघूर प्रकल्प यांसारख्या महत्त्वाच्या योजनांना गती देऊन त्यांनी हजारो हेक्टर कोरडी जमीन ओलिताखाली आणली.

भाऊंची जलसंपदा क्षेत्रातील कार्यपद्धती ही केवळ कागदी मंजुरीपुरती मर्यादित नव्हती. त्यांनी 'थेंब अन् थेंब पाण्याचे नियोजन' या सूत्रावर काम केले. जलयुक्त शिवार अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करून गावागावांत पाणी अडवून जिरवण्याचे काम त्यांनी केले. नदीजोड प्रकल्प आणि आधुनिक उपसा जलसिंचन योजनांच्या माध्यमातून दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या थेट शेतापर्यंत पाणी पोहोचवण्याचे भगीरथ काम त्यांनी केले. त्यांच्या या दूरदृष्टीमुळे आज महाराष्ट्रातील हजारो शेतकरी आत्मविश्वासाने उभे असून शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करत आहेत.

. भाऊ, जुन्या एकनिष्ठ कार्यकर्त्यांना विसरू नका!

ना. गिरीशभाऊ महाजन आज यशाच्या ज्या सर्वोच्च शिखरावर विराजमान आहेत, त्या शिखराची पायाभरणी करण्यामध्ये त्यांच्या जुन्या, निष्ठावंत आणि कट्टर कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा आहे. हा तो काळ होता जेव्हा पक्षाला कोणी विचारत नव्हते, जेव्हा सत्तेची दूरदूरपर्यंत चिन्हे नव्हती आणि विरोधकांचा प्रचंड दरारा होता. अशा कठीण काळात याच निष्ठावंतांनी स्वतःच्या घरादारावर तुळशीपत्र ठेवावे इतक्या त्यागाने, स्वतःची तहान-भूक विसरून, रात्रीचा दिवस करत भाऊंच्या नेतृत्वाचा झेंडा आपल्या खांद्यावर घेतला होता. पायात चपला नसताना, खिशात दमडी नसताना केवळ भाऊंवर असलेल्या प्रेमापोटी गावागावांत फिरून पायाला भिंगरी लावल्यासारखे काम करणारे हेच ते मूळ कार्यकर्ते आहेत.

आज सत्तेचा सुवर्णकाळ आल्यानंतर अवतीभवती 'आयाराम-गयाराम' लोकांचा मोठा गराडा दिसू लागला आहे.

सत्तेच्या गोडव्यात सामील झालेले हे आयाराम केवळ तात्पुरते सोबती असतात; सत्तेची हवा बदलली की हे लोक सर्वात आधी पळ काढतील. पण भाऊ, जो तुमच्या कठीण काळात, संघर्षाच्या दिवसांत तहान-भूक सोडून पाठीशी खंबीरपणे उभा होता, तोच तुमचा खरा एकनिष्ठ आणि हक्काचा माणूस आहे. सत्तेच्या अथांग गर्दीत आणि व्यस्ततेत या जुन्या शिलेदारांची जागा, त्यांचा सन्मान आणि त्यांची आपुलकी कधीही कमी होऊ नये, हीच आज भाऊंच्या वाढदिवसानिमित्त सर्व जुन्या कार्यकर्त्यांची अंतःकरणातून व्यक्त होणारी भावना आहे. कारण निष्ठावंत हा सत्तेसाठी नाही, तर भाऊंच्या एका शब्दासाठी जिवाचे रान करणारा असतो.

**॥ निष्ठा आणि संघर्षाचा बुलंद आवाज ॥**

सत्तेच्या वाटा धूसर असताना ज्यांनी रक्ताचे पाणी केले, तहान-भूक विसरून जे भाऊंच्या प्रत्येक संघर्षात ढाल बनून उभे राहिले, तेच आजच्या वैभवाचे खरे शिल्पकार आहेत.

आयाराम हे सत्तेचे प्रवासी असतात, पण एकनिष्ठ कार्यकर्ते हे सुख-दुःखाचे जन्मांतराचे सोबती असतात. भाऊ आपल्या या जुन्या शिलेदारांना कधीही विसरणार नाहीत, हाच आम्हा सर्व निष्ठावंतांना दृढ विश्वास आहे!

**. आपत्ती व्यवस्थापन:**

संकटाच्या छाताडावर पाय देणारा 'संकटमोचक'

आपत्ती व्यवस्थापन खाते हे केवळ प्रशासकीय फाईल्स हाताळण्याचे क्षेत्र नाही, तर जेव्हा सामान्य जनता नैसर्गिक आपत्तीत किंवा मोठ्या संकटात होरपळत असते, तेव्हा स्वतःच्या जीवाची बाजी लावून मैदानात उतरण्याचे काम असते. गिरीशभाऊंकडे या खात्याची जबाबदारी असणे हा महाराष्ट्रातील जनतेसाठी सर्वात मोठा दिलासा आहे. राज्यात कुठेही पूर असो, अतिवृष्टी असो, भूकंप असो वा एखादी मोठी दुर्घटना, भाऊ कधीही मंत्रालयात बसून केवळ आदेश देत नाहीत, तर ते स्वतः घटनास्थळी धावून जातात.

कोल्हापूर आणि सांगलीत आलेल्या भीषण महापुराची आठवण आजही सर्वांच्या अंगावर काटा आणते. त्या भीषण पुरात, गळ्यापर्यंत चिखलाच्या आणि पाण्याच्या प्रवाहात उतरून मदत आणि बचाव कार्याचे थेट नेतृत्व स्वतः आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीशभाऊंनी केले होते. एनडीआरएफ (NDRF) आणि स्थानिक रेस्क्यू टीमच्या सोबत खांद्याला खांदा लावून त्यांनी हजारो अडकलेल्या नागरिकांना सुखरूप बाहेर काढले. संकटाच्या काळात थेट ग्राउंडवर उतरून जनतेला धीर देण्याच्या याच धाडसी वृत्तीमुळे संपूर्ण महाराष्ट्राने त्यांना आदरपूर्वक 'संकटमोचक' ही पदवी बहाल केली आहे.

**'जामनेर पॅटर्न' आणि ग्रामविकासाचा नवा अध्याय**

गिरीशभाऊंनी आपल्या आमदारकीच्या कार्यकाळात जामनेर तालुक्याचा केलेला चौफेर विकास आज संपूर्ण राज्यात 'जामनेर पॅटर्न' म्हणून अभ्यासला जातो. अत्याधुनिक उपजिल्हा रुग्णालय, देखण्या प्रशासकीय इमारती, भव्य क्रीडा संकुल, उड्डाणपूल आणि ग्रामीण भागाला जोडणारे सिमेंट रस्ते यामुळे जामनेरचा चेहरामोहरा बदलला आहे. सध्या राज्याचे मंत्री म्हणून काम करताना त्यांनी याच विकासाचे मॉडेल संपूर्ण महाराष्ट्रात राबवण्याचा ध्यास घेतला आहे. ग्रामपंचायतींचे संगणकीकरण, गावपातळीवर पायाभूत सुविधांची निर्मिती आणि महिला बचत गटांचे आर्थिक सक्षमीकरण यावर त्यांचा विशेष भर आहे.

**७. आरोग्य क्षेत्रातील देवदूत:** लाखो रुग्णांचे आधारवड

गिरीशभाऊ महाजन यांच्या कारकिर्दीतील सर्वात महत्त्वाचे आणि मानवी पान म्हणजे त्यांनी आरोग्य क्षेत्रात केलेले कार्य होय. त्यांच्या कल्पनेतून साकारलेली 'महाआरोग्य शिबिरे' हा देशातील एक मैलाचा दगड ठरली आहेत, ज्या माध्यमातून लाखो गरीब रुग्णांवर मोफत उपचार आणि शस्त्रक्रिया करण्यात आल्या. आजही जळगाव जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून जेव्हा एखादा गरीब रुग्ण पैशांअभावी उपचारासाठी अडकतो, तेव्हा भाऊंचे कार्यालय त्याच्यासाठी मदतीचे दरवाजे २४ तास उघडे ठेवते. रुग्णांच्या पाठीवर मायेचा हात ठेवून त्यांना आर्थिक बळ देणारा हा नेता अनेकांसाठी साक्षात देवदूत ठरला आहे.

॥ लोकनेते ना. गिरीशभाऊ महाजन यांना उदंड आयुष्याच्या हार्दिक शुभेच्छा ॥

महाराष्ट्राचे कणखर जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन मंत्री, दुष्काळमुक्तीचे प्रणेते आणि लाडके विकासपुरुष ना. श्री. गिरीशभाऊ महाजन यांना जन्मदिनाच्या मनःपूर्वक आणि लक्ष-लक्ष हार्दिक शुभेच्छा! सत्तेच्या अथांग गर्दीत आपल्या जुन्या आणि एकनिष्ठ कार्यकर्त्यांना सदैव हृदयात मानाचे स्थान देणाऱ्या आमच्या लाडक्या भाऊंना आई जगदंबा दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि जनसेवेची अशीच उत्तरोत्तर शक्ती देवो हीच प्रार्थना!

– शुभेच्छुक: तहान-भूक विसरून सदैव पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे आपले जुने, निष्ठावंत कार्यकर्ते, समस्त जामनेरकर जनता आणि महाराष्ट्रभरातील अफाट चाहता वर्ग







-शुभेच्छूक-
चक्रधर कन्ट्रक्शन केऱ्हाळे ता. रावेर
महेंद्र पाटील



-शुभेच्छूक-
महालक्ष्मी कन्ट्रक्शन



मा.श्री.व्ही.डी.पाटील साहेब
(माजी माहिती आयुक्त, अधिक्षक अभियंता, जळगाव यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा



-शुभेच्छूक-
श्री.जी.व्ही.पी.आर. कन्ट्रक्शन

## संपादकीय

### ‘ईव्ही’ला परदेशी ‘करंट’

तापमानाचा पारा अर्धशतक झळकावण्याच्या दिशेने चाललेला असताना, उष्णतेच्या लाटांनी सर्वदूर होरपळ होत असताना भारतीय हवामान खात्याने दिलेली मान्सूनच्या आगमनाची सुवार्ता दिलासादायक आहे. यंदा मान्सूनचे आगमन वेळेपूर्वी होण्याची दाट शक्यता आहे. मान्सूनच्या प्रवासासाठी सध्या अत्यंत पोषक स्थिती तयार झाली असून, १६ मे च्या सुमारास बंगालचा उपसागर, अंदमान समुद्र आणि अंदमान–निकोबार बेटांवर मान्सूनचे आगमन होऊ शकते, असे हवामान खात्याचे म्हणणे आहे. मान्सूनच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेले समुद्रावरील वार्यांची दिशा, आर्द्रता आणि वातावरणीय दाबाचे घटक सध्या अनुकूल आहेत. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्यामुळे मान्सूनची पावले वेगाने भारताच्या दिशेने पडू लागली आहेत. मान्सूनचा हा प्रवास असाच अखंड सुरू राहिल्यास केरळ आणि महाराष्ट्रातही पाऊस वेळेपूर्वी धडकू शकतो. मान्सूनचे आगमन नेमके झाले आहे का, मान्सूनपूर्व पाऊस आहे की अवकाळी ही चर्चा दरवर्षी रंगते. हवामान खात्याच्या संकेतांनुसार मान्सूनच्या अधिकृत आगमनासाठी केवळ पाऊस पुरेसा नसून तीन अटी पूर्ण होणे आवश्यक असते. एक म्हणजे केरळमधील १४ ठरावीक हवामान केंद्रांपैकी किमान ६० टक्के केंद्रांवर सलग दोन दिवस २.५ मिलिमीटर किंवा त्यापेक्षा जास्त पावसाची नोंद होणे. दुसरी म्हणजे वातावरणातील वार्याचा वेग ठरावीक उंचीवर ठरावीक मर्यादेपेक्षा जास्त असणे आणि तिसरी म्हणजे उपग्रहाद्वारे मोजल्या जाणार्या उष्णतेच्या लहरींचे प्रमाण विशिष्ट मर्यादेच्या खाली असणे. या तिन्ही गोष्टींची पूर्तता झाल्यावरच मान्सून केरळमध्ये दाखल झाल्याचे जाहीर केले जाते. मान्सूनच्या आगमनाच्या तारखेत दरवर्षी तफावत आढळते. तरीही साधारणपणे एक जूनला मान्सून केरळमध्ये दाखल होतो. गतवर्षी मात्र तो २४ मे रोजी तर २०२४ मध्ये ३० मे रोजी पोहोचला होता. गेल्या पाच वर्षांत मे महिन्याच्या मध्यानंतर दक्षिण भारतात आणि बंगालच्या उपसागरात मान्सूनपूर्व हालचालींना वेग आल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. भारतातील एकूण पावसाच्या ७० टक्क्यांहून अधिक पाऊस जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत पडतो. मान्सूनचे लवकर किंवा उशिरा येणे याचा परिणाम विविध क्षेत्रांवर होतो. खरीप हंगामातील पेरण्यांचे संपूर्ण नियोजन मान्सूनच्या आगमनावर अवलंबून असते. मान्सून वेळेवर आला, तर जमिनीतील ओलावा पेरणीसाठी अनुकूल बनतो. यामुळे उत्पादनात वाढ होते. याउलट मान्सून लांबणीवर पडल्यास पिकांचे चक्र विस्कळीत होते आणि त्याचा फटका अन्नधान्य उत्पादनाला बसतो. प्रमुख धरणे आणि नद्यांमधील पाणीसाठा मान्सूनवरच अवलंबून असतो. मान्सूनचे आगमन वेळेवर झाल्यास जलविद्युत प्रकल्पांची कार्यक्षमता टिकून राहते आणि उन्हाळ्यातील पाणीटंचाईचा ताण कमी होण्यास मदत होते. मान्सूनच्या अनिश्चिततेमुळे शेती उत्पादनात घट झाल्यास अन्नधान्याचे भाव वाढूत त्याचा फटका सर्वसामान्यांना आणि विकास दराला बसतो. अरबी समुद्र, बंगालच्या उपसागरातील पृष्ठभागाचे वाढते तापमान मान्सूनच्या आगमनावर परिणाम करत आहे. हवामान बदलामुळे मान्सून आगमनाची तारीख आणि पावसाचे वितरण यात मोठी अनिश्चितता निर्माण झालीय. आगमनाइतकेच मान्सूनचे वितरणही महत्त्वाचे आहे. वेळेवर दाखल होऊन नंतर खंड पडल्यास शेतकर्यांवर दुबार पेरणीचे संकट येते. गेल्या काही वर्षांत कमी कालावधीत जास्त पाऊस पडण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. पूर्वी पावसाळ्यात १०० दिवस पाऊस पडायचा. आता एखाद्या वर्षी तो ८० तास पडतो, तर एखाद्या वर्षी अतिवृष्टी होऊन ओल्या दुष्काळाचे संकट निर्माण होते. यंदा अल निनो सक्रिय झाल्यामुळे मान्सून सरासरीपेक्षा कमी बरसण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. शेतकरी, सामान्य जनता आणि शासन–प्रशासन सारेजण त्यामुळे काहीसे चिंतेत आहेत. मे महिन्याच्या उत्तरार्धातील स्थिती महत्त्वाची आहे. अरबी समुद्र किंवा बंगालच्या उपसागरात या काळात निर्माण होणारी चक्रीवादळे मान्सूनच्या वाटचालीवर परिणाम करतात. हे चक्रीवादळ ओमान किंवा पाकिस्तानच्या दिशेने सरकले, तर ते मान्सूनसाठी आवश्यक असलेली आर्द्रता सोबत घेऊन जाते. यामुळे मान्सूनचे वारे कमकुवत होतात आणि केरळमध्ये पावसाचे आगमन लांबणीवर पडते. यंदा अशी शक्यता दिसत नाही, हीदेखील आनंदाची बाब आहे.अल निनो सक्रिय असतानाच्या काही वर्षांमध्ये भारतीय उपखंडात पर्जन्यमान चांगले राहिल्याची उदाहरणे इतिहासात आढळतात. १९५१ ते २०२३ या कालावधीतील सुमारे १५ अल निनो वर्षांपैकी साधारण ६ वर्षांमध्ये भारतात सामान्य किंवा सामान्यपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली. यामागे ‘इंडियन ओशन डायपोल’ हा घटक अत्यंत प्रभावी ठरतो. हिंदी महासागराचा पश्चिम भाग पूर्वेकडील भागापेक्षा जास्त उबदार असतो, तेव्हा त्याला ‘पॉझिटिव्ह आयओडी’ म्हटले जाते. हा घटक प्रशांत महासागरातील अल निनोच्या नकारात्मक प्रभावाला निष्प्रभ करतो. १९९७ मध्ये शतकातील सर्वात शक्तिशाली अल निनो सक्रिय असूनही भारताने सामान्यपेक्षा जास्त म्हणजे १०२ टक्के पाऊस अनुभवला होता. त्यामुळे अल निनो, भीषण दुष्काळ असे म्हणत भुई थोपटण्यापूर्वी मान्सूनला अनुकूल अन्य घटकांमधील बदलांकडे लक्ष ठेवणे आवश्यक ठरते. पाऊस किती पडतो यापेक्षाही आपण तो साठवतो किती, जमिनीमध्ये किती जिरवतो हे अधिक महत्त्वाचे आहे. आजवर आलेल्या दुष्काळांनी प्रचंड मोठे नुकसान सोसावे लागले. तरीही जल संवर्धन, पाणीवापर याबाबत समाजात पुरेशी जागरुकता नाही. जलयुक्त शिवार योजनेतून राज्यातील किती तरी गावांची पाणीटंचाई दूर होऊन तेथील भूजलपातळी उंचावली. नाला खोलीकरण, रुंदीकरण, सिमेंट साखळी बंधारे यांचा समावेश असणारा हा उपक्रम महाराष्ट्राला पाणीदार करणारा आहे. या मोहिमेमुळे राज्यात सुमारे २५ लाख टीसीएमहून अधिक पाणी साठवण क्षमता निर्माण झाली. यंदा मान्सून काळात जास्तीत जास्त जलसंवर्धन झाल्यास पावसात पडणार्या खंडामुळे निर्माण होणारा ताण जाणवणार नाही. जागतिक संकटामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा सामना करताना इंधनाचा काटकसरीने वापर करण्याबाबत समाज जागृत होत आहे.

## इस्त्रायलमध्ये ‘होम बेस्ड केअरगिव्हर’ पदांसाठी ३५०० जागांची भरती; पात्र उमेदवारांसाठी सुवर्णसंधी

जळगाव (जिमाका)– इस्त्रायलमध्ये होम बेस्ड केअरगिव्हर (Home Based Caregiver) पदांसाठी तब्बल ३५०० जागांची भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली असून भारतातील पात्र महिला व पुरुष उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. आकर्षक वेतन, निवास, वैद्यकीय सुविधा आणि दीर्घकालीन रोजगाराच्या संधीमुळे ही भरती इच्छुकांसाठी मोठी संधी ठरत आहे.

या भरतीमध्ये महिलांना ९० टक्के व पुरुषांना १० टक्के संधी देण्यात येणार आहे. उमेदवारांचे वय २५ ते ४५ वर्षांदरम्यान असणे आवश्यक असून उंची किमान १.५ मीटर आणि वजन किमान ४५ किलो असणे बंधनकारक आहे. शैक्षणिक पात्रतेमध्ये किमान दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक असून इंग्रजी भाषेचे मध्यम ज्ञान अपेक्षित आहे.

उमेदवारांकडे केअरगिव्हर प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवाराने किमान ९९० तासांचा कोर्स (जगढ सहित) पूर्ण केलेला असावा किंवा GD--NM, GNM², BSc, Nursing, Post BSc Nursing, Nursing -ssistant, Physiotherapy किंवा Midwifery संबंधित मान्यताप्राप्त डिप्लोमा पूर्ण केलेला असावा. तसेच पासपोर्टची वैधता किमान ३ वर्षे असणे आवश्यक आहे.

निवड झालेल्या उमेदवारांना दरमहा सुमारे १,९९,७७० रुपये इतके वेतन मिळणार आहे. याशिवाय नियोक्त्याकडून निवास, अन्न व वैद्यकीय विम्याची सुविधा दिली जाणार आहे.

उमेदवारांना आठवड्यातून ६ दिवस काम करावे लागणार असून ‘लाईव्ह–इन केअरगिव्हर’ स्वरूपात वृद्ध, अपंग व विशेष गरजा असलेल्या व्यक्तींची काळजी घ्यावी लागेल. कामाच्या स्वरूपात रुग्णांना आंघोळ घालणे, कपडे बदलणे, औषधे देणे, स्वयंपाक, साफसफाई, खरेदी, घरकाम तसेच दैनंदिन हालचालींमध्ये मदत करणे यांचा समावेश आहे. उमेदवारांना वार्षिक १६ दिवसांची रजा व ९ धार्मिक/राष्ट्रीय सुट्ट्यांचा लाभ मिळणार आहे. करार कालावधी २ वर्षांचा असून तो नुतनीकरणीय आहे.

भरती प्रक्रियेसाठी उमेदवारांनी PCC (Police Clearance Certificate) सादर करणे आवश्यक आहे. तसेच ज्या उमेदवारांनी ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी परदेशात वास्तव्य केले आहे, त्यांच्यासाठी Overseas PCC अनिवार्य राहील. ऑनलाइन व व्हिडिओ रेकॉर्डेड मुलाखतीद्वारे निवड प्रक्रिया पार पडणार असून अंतिम निवड इस्त्रायली नियोक्त्याकडून केली जाईल. या प्रक्रियेत National Skill Development Corporation (NSDC) समन्वयक म्हणून कार्य करणार आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे उमेदवारांनी यापूर्वी इस्त्रायलमध्ये काम केलेले नसावे. तसेच उमेदवाराचे पती/पत्नी, पालक किंवा मुले सध्या इस्त्रायलमध्ये वास्तव्यास किंवा नोकरीत नसावेत, अशी अट घालण्यात आली आहे.

भरती प्रक्रियेसाठी उमेदवारांना नोंदणी शुल्क, वैद्यकीय तपासणी, पोलीस पडताळणी, व्हिडिओ मुलाखत शुल्क, व्हिसा प्रक्रिया व विमानप्रवासाचा खर्च स्वतः करावा लागणार आहे. अंदाजे प्रारंभिक खर्च सुमारे १.४७ लाखांपेक्षा अधिक असू शकतो. या भरतीसाठी इच्छुक उमेदवारांनी अधिक माहितीसाठी maharashtrainternational.com या संकेतस्थळास भेट द्यावी.

जळगाव जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संदीप ज्ञा. गायकवाड, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जळगाव यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२५७–२९५९७९० वर संपर्क साधावा किंवा शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, जी.एस. ग्राऊंडजवळ, जळगाव येथे कार्यालयीन वेळेत भेट द्यावी.

## शालेय वाहनांच्या कागदपत्रांची तपासणी अनिवार्य ; ३१ मे पुर्वी कागदपत्रांची पुर्तता करण्याचे आवाहन

जळगाव (जिमाका)–: जिल्ह्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांनी जून २०२६ पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक सत्रापूर्वी स्कूलबस व व्हॅनची कागदपत्रे तपासणे अनिवार्य करण्यात आले आहे.

वाहनाची योग्यता प्रमाणपत्र, परवाना, पीयूसी, विमा आदी कागदपत्रे वैध असल्याची खात्री करूनच विद्यार्थ्यांच्या वाहतुकीस परवानगी द्यावी.

शाळा व्यवस्थापन स्तरावर प्रत्यक्ष तपासणी करुन कागदपत्रे अपूर्ण असल्यास हे कागदपत्रे वैध करुन घेण्याबाबत संबंधित वाहनचालक , मालक यांना शाळा व्यवस्थापन स्तरावरुन सुचना देण्यात याव्यात.

वाहनांची सर्व कागदपत्रे वैध असल्यावरच त्यांना शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करण्याची मुभा द्यावी. शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक सुरक्षितपणे व विना अपघात व्हावी यासाठी सर्व शैक्षणिक संस्थांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत देण्यात आले आहेत.तपासणी दरम्यान कागदपत्रे अपूर्ण आढळल्यास संबंधित वाहन जप्त करण्यात येणार असून, त्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन व वाहनधारकांवर राहील व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या होणा–या गैरसोयीस संबंधित शाळा व्यवस्थापन / वाहतुकदार यांची सर्वस्वी जबाबदारी राहील असेही प्रादेशिक परिवहन कार्यालयाने स्पष्ट केले आहे.

तसेच जिल्ह्यातील सर्व परवानाधारक स्कूलबस , व्हॅन वाहनधारक , चालक यांनी नियमानुसार त्यांच्या वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण तसेच वाहनकर व इतर अनुषंगिक कागदपत्रांची ३१ मे २०२६ पूर्वी पूर्तता करुन घ्यावी.

योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी विशेष बाब म्हणून या कार्यालयातर्फे अतिरिक्त अपॉईंटमेंट (विशेष कोटा) ची सुविधा उपलब्ध करुन येणार असल्याची माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी राजेंद्र वर्मा यांनी दिली.

## जळगाव जिल्ह्यात १५ ते २९ मेदरम्यान प्रतिबंधात्मक आदेश लागू

जळगाव (जिमाका वृत्तसेवा) – सध्या आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर तसेच आगामी सण–उत्सव, थोर व्यक्तींच्या जयंती–पुण्यतिथींचया पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यात मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अंतर्गत जळगाव जिल्ह्यात दिनांक १५ मे २०२६ रोजी रात्री १२.०१ वाजेपासून ते २९ मे २०२६ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी या कालावधीत जिल्ह्यात शस्त्रे, दाहक किंवा स्फोटक पदार्थ बाळगणे, दगड किंवा तत्सम वस्तू जमा करणे, सार्वजनिक ठिकाणी उत्तेजक घोषणा देणे, आक्षेपार्ह हावभाव करणे तसेच व्यक्तींच्या प्रतिमांचे दहन करणे यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच, पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा जमाव करण्यासाठी पोलीस अधीक्षकांची पूर्वपरवानगी आवश्यक राहणार असून, विनापरवानगी सभा किंवा मिरवणुका काढण्यास मनाई करण्यात आली आहे.

दरम्यान, हा आदेश शासकीय कार्यक्रम, धार्मिक मिरवणुका, लग्न समारंभ व प्रेतयात्रा यांना लागू नसून, तसेच कर्तव्य बजावताना शस्त्र बाळगणे आवश्यक असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांनाही यातून सूट देण्यात आली आहे. हे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी वैशाली चव्हाण यांनी जारी केले आहे.

## जैन इरिगेशन सिस्टीम्सची दमदार कामगिरी जागतिक अनिश्चिततेतही महसूल,EBITDA आणि रोख निर्मितीत उल्लेखनीय वाढ

जळगाव/मुंबई ( प्रतिनिधी ) – जागतिक पातळीवरील भू–राजकीय घडामोडी, पॉलिमरच्या वाढत्या किमती आणि बाजारातील अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवरही जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. कंपनीने आर्थिक वर्ष २०२६ च्या चौथ्या तिमाहीत भक्कम कामगिरी नोंदवली आहे. कंपनीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन यांनी निकालांवर भाष्य करताना महसूल, नफा आणि रोख निर्मितीत उल्लेखनीय वाढ झाल्याचे सांगितले. जैन हिल्स येथे झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीनंतर चौथ्या तिमाहीचा निकाल जाहिर करण्यात आला.

जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. कंपनीच्या आर्थिक वर्ष २०२६ च्या चौथ्या तिमाहीत ‘हाय–टेक’ आणि ‘अ‍ॅग्रो प्रोसेसिंग’ विभागांच्या मजबूत कामगिरीमुळे कंपनीने वार्षिक तुलनेत ४.३ टक्के एकत्रित महसूल वाढ नोंदवली. प्रतिकूल परिस्थितीतही कंपनीने २३३ कोटी रुपयांची रोख निर्मिती केली असून, ती EBITDAच्या जवळपास ९७ टक्के इतकी आहे.

संपूर्ण आर्थिक वर्षाचा विचार करता, कंपनीने एकत्रित महसुलात दुहेरी अंकी वाढ साध्य केली आहे. आर्थिक वर्ष २०२६ मधील एकत्रित EBITDA८०९ कोटी रुपये इतका असून, तो मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत १२.८ टक्क्यांनी अधिक आहे. खेळत्या भांडवलाच्या प्रभावी व्यवस्थापनामुळे कंपनीच्या खेळत्या भांवडला मध्ये सुधारणा झाली असून, कंपनीला ६१९ कोटी रुपयांचा रोख निर्मिती करण्यात यश आले आहे. ही रक्कम EBITDAच्या सुमारे ७६ टक्के इतकी असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

**भविष्यात महसूल वाढीचे लक्ष्य – अनिल जैन**

जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. कंपनी सध्या बदलत्या जागतिक परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. कच्च्या मालाच्या किमती आणि आंतरराष्ट्रीय व्यापार प्रवाहावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच भारतीय हवामान विभागाने यंदा मान्सून सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज व्यक्त केला असला, तरी धोरणांमधील सातत्य तसेच सिंचन आणि पायाभूत सुविधांवरील वाढता खर्च यामुळे बाजारातील मागणीला चालना मिळेल असे अपेक्षित आहे. भविष्यात महसूल वाढ, प्रकल्पांमधील येणी वसुली सुधारणा आणि शाश्वत मुक्त रोख प्रवाह निर्माण करण्यावर कंपनीचे विशेष लक्ष्य राहणार असल्याचेही कंपनीचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन यांनी स्पष्ट केले.

## २० मे रोजी औषधांची दुकाने बंद! ‘एफडीए’चे नागरिकांना आगाऊ औषध खरेदीचे आवाहन

जळगाव –अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेने आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी येत्या बुधवार, २० मे २०२६ रोजी संपूर्ण देशभरात लाक्षणिक बंदची हाक दिली आहे. या आवाहनानुसार जळगाव शहर आणि जिल्ह्यातील सर्व ठोक व किरकोळ औषध विक्रेते आपले व्यवहार बंद ठेवणार आहेत. यामुळे जिल्ह्यातील औषध बाजारपेठ पूर्णपणे ठप्प राहण्याची शक्यता असल्याने, नागरिकांनी आणि रुग्णांच्या नातेवाईकांनी आपल्या घरातील अत्यावश्यक औषधे आणि वैद्यकीय साहित्याची आगाऊ व्यवस्था करून ठेवावी, असे जाहीर आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाने केले आहे.

दरम्यान, आपत्कालीन सेवा, शासकीय रुग्णालये तसेच काही निवडक औषध दुकाने सुरू राहण्याची शक्यता आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी औषध प्रशासन व पोलीस विभागाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

या पार्श्वभुमीवर, सहायक आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, जळगाव यांनी केमिस्ट बांधवांना आवाहन केले आहे की, या बंदमध्ये सहभागी होऊ नये. औषधे ही अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत येत असल्याने रुग्णांना औषधांचा पुरवठा न करणे हे कायद्याचे उल्लंघन ठरू शकते, अशा सूचनाही त्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ व औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० अंतर्गत नियमांचे पालन करणे बंधनकारक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

रुग्णांना औषधांच्या अभावामुळे कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी संघटनांनी योग्य खबरदारी घ्यावी, असे प्रशासनाने नमूद केले आहे. तसेच आपत्कालीन परिस्थितीत औषधे उपलब्ध न झाल्यास सहायक आयुक्त (औषधे) डॉ. प्र.भा. अस्वार – मो. ९४२२३५६१४३ व श्रीमती क. र. पाटील – मो. ९८६०१७२५६१ यांच्याशी संपर्क साधावा व नागरिकांनी शांतता व संयम राखून औषध प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## जळगावकरांना दिलासा! गेल्या २४ तासांत तापमानात मोठी घट

जळगाव– गेल्या काही दिवसांपासून जळगाव शहरासह जिल्ह्यात तापमानाचा पारा ४५ अंशावर गेल्याने तीव्र उष्णतेच्या लाटेने जळगावकर प्रचंड होरपळून निघाले होते. मात्र, आता या वाढत्या पाऱ्याला ब्रेक लागला असून जळगावकरांना कडक उन्हापासून काहीसा दिलासा मिळाला आहे. गेल्या २४ तासांत जळगावच्या तापमानात तब्बल ३ अंश सेल्सिअसची लक्षणीय घट झाली असून १५ मे रोजी जळगावचे तापमान ४२.४ अंशांवर खाली आले आहे. तापमानात घसरण झाली असली तरी उकाडा कायम होता.

## धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त

## जामनेर शहरात मंत्री गिरीशभाऊ महाजन केले महाराजांना विनम्र अभिवादन

जामनेर – धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जामनेर शहरात आयोजित भव्य उत्सवात मंत्री गिरीश भाऊ महाजन यांनी सहभागी होत महाराजांना विनम्र अभिवादन केले.

यावेळी पारंपारिक शिवकालीन शस्त्रकला, ढोल–ताशांचा गजर आणि उत्साहाने भरलेली भव्य मिरवणूक यामुळे संपूर्ण वातावरण मंगलमय झाले होते.



स्वराज्य, स्वाभिमान आणि धर्मरक्षणासाठी अखेरच्या श्वासापर्यंत लढणारे छत्रपती संभाजी महाराज यांचे शौर्य आणि बलिदान आजही प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. यावेळी भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते हजर होते .


**संपादक** : सदाशिव रामदास इंगळे जळगाव प्रहार हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक सौ.विमल सदाशिव इंगळे यांनी वरद ऑफसेट जे. ७४ एमआयडीसी बी.एच. लोकमत ऑफिस शेजारी, जळगांव–४२५००१ येथे छापून एफ–२–३, तिसरा मजला, गोलणी मार्केट, जळगांव– ४२५००१ येथून प्रकाशित केले.



या दैनिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर प्रकरणे जळगाव न्यायालयांतर्गत जातील अन्यत्र कोठेही नाही.



जळगाव प्रहार

email-dailyjalgaonprahar@gmail.com

एफ–२–३, तिसरा मजला, गोलणी मार्केट, जळगांव



जाहिराती/ बातम्यांसाठीसंपर्क

मच्छिंद्र इंगळे

(कार्यकारी संपादक)

मो.९७३०५७०९०६

# जामनेर तालुक्याचा लाडके मंत्री महोदयांना आग्रहाचा साद: सिंचनक्रांतीचे भगीरथ मा. श्री. व्ही. डी. पाटील साहेबांना आता राज्य पातळीवर मोठ्या पदाची संधी द्या!

## संघर्षाच्या काळापासून तहान-भूक विसरून राबणारे 'एकनिष्ठ' शिलेदार; माजी राज्य माहिती आयुक्त तथा द्रष्ट्या अभियंत्याच्या अथांग अनुभवाचा गौरव करण्याची आता योग्य वेळ; आयारामांच्या गर्दीत मूळ निष्ठावंताला सन्मानाची मागणी!

**विशेष प्रतिनिधी । जामनेर**

जळगाव -जामनेर तालुक्याच्या आणि जळगाव जिल्ह्याच्या राजकीय व सामाजिक वर्तुळातून सध्या एकच सूर, एकच बुलंद मागणी अत्यंत तीव्रतेने उमटत आहे. ती मागणी म्हणजे, पळासखेडा सारख्या एका साध्या शेतकरी कुटुंबातून येऊन आपल्या अफाट बुद्धिमत्तेच्या बळावर सिंचन क्षेत्रात क्रांती घडवणारे, माजी राज्य माहिती आयुक्त मा. श्री. व्ही. डी. पाटील साहेब यांना आता राज्य पातळीवर किंवा केंद्र स्तरावरील एखाद्या अत्यंत महत्त्वाच्या सर्वोच्च पदावर किंवा सल्लागार समितीवर संधी देण्यात यावी. उद्या, मतदारसंघाचे लाडके लोकनेते, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री ना. श्री. गिरीशभाऊ महाजन यांच्या वाढदिवसाच्या या शुभमुहूर्तावर, संपूर्ण जामनेर तालुका भाऊंच्या चरणी हा आग्रहाचा साद घालत आहे. सत्तेच्या सुवर्णकाळात अवतीभवती फिरणारे 'आयाराम-गयाराम' हे तात्पुरते असतात, पण जो संघर्षाच्या काळात तहान-भूक विसरून पाठीशी उभा राहिला, तोच खरा एकनिष्ठ असतो, या भावनेतून आज जामनेरची जनता आपल्या या जुन्या शिलेदारासाठी हक्काची मागणी करत आहे.

१. 'पळासखेडा' ते 'माहिती आयुक्त': एका निष्ठावंताचा धगधगता प्रवास श्री. व्ही. डी. पाटील साहेबांचा प्रवास हा जमिनीवरील संघर्षातून आणि अहोरात्र कष्टांतून तावून-सुलाखून निघालेला प्रवास आहे. जामनेर तालुक्यातील पळासखेडा या छोट्याशा गावातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या पाटील साहेबांनी ग्रामीण भागातील पाणीटंचाईचे आणि शेतकऱ्यांचे दुःख लहानपणापासून जवळून पाहिले होते. याच वेदनेतून शेतकऱ्यांच्या आयुष्यात पाणी कसे आणता येईल? हा ध्यास घेऊन त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकीची पदवी घेतली आणि जलसंपदा विभागात शासकीय सेवेत प्रवेश केला. शासकीय सेवेत अधीक्षक अभियंता पदावर असताना त्यांनी केवळ पदाचा बडेजाव मिरवला नाही, तर राजकारणाच्या पलीकडे जाऊन काम करणारा अधिकारी म्हणून नाव कमावले. त्यांची हीच कार्यक्षमता आणि पारदर्शकता पाहून पुढे त्यांची 'राज्य माहिती आयुक्त' (नागपूर खंडपीठ) या अत्यंत महत्त्वाच्या घटनात्मक पदावर नियुक्ती झाली. तिथेही त्यांनी हजारो प्रलंबित प्रकरणांचा तात्काळ निपटारा करत प्रशासनाला नवा आरसा दाखवला.

२. 'जामनेर पॅटर्न' आणि 'बोदवड योजनेचे' खरे शिल्पकार आज मंत्री महोदय ना. गिरीशभाऊ महाजन संपूर्ण महाराष्ट्रात ज्या 'जामनेर विकास पॅटर्न'चा गौरव अभिमानाने करतात, त्या पॅटर्नच्या तांत्रिक जडणघडणीत आणि सिंचन क्रांतीच्या पायाभरणीत व्ही. डी. पाटील साहेबांचा सिंहाचा वाटा आहे. १९८८ च्या सुमारास जामनेर येथे सिंचन उपविभागाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर पाटील साहेबांनी तालुक्याच्या भूगोलाचा सखोल अभ्यास करून अनेक सिंचन प्रकल्पांचे सविस्तर अहवाल (DPR) तयार करून ठेवले. कमानी तांडा प्रकल्प: नदीचा प्रवाह अडवून गुरुत्वाकर्षणाच्या तत्त्वावर पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी विविध सिंचन प्रकल्पांकडे वळवण्याची त्यांची कमानी तांडा ही अभिनव संकल्पना आजही जिल्हाभरात कौतुकाचा विषय आहे. साहेबांवर असलेल्या अढळ विश्वासामुळे अनेक शेतकऱ्यांनी कोणतीही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच स्वखुशीने आपल्या जमिनी दिल्या होत्या, हा त्यांच्या प्रामाणिकपणाचा जिवंत पुरावा आहे. शेततळे संकल्पना: आज संपूर्ण राज्यभरात गाजत असलेली शेततळे (Farm Pond) योजना जामनेरच्या मातीत सर्वात आधी रुजवणारे आणि त्याचे दूरगामी फायदे दाखवून देणारे पाटील साहेबच होते. बोदवड सिंचन योजना व मेगा रिचार्ज: अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा बोदवड सिंचन योजनेची संकल्पना त्यांनी थेट राष्ट्रपती भवनात तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्यासमोर सादरीकरण करून पटवून दिली होती. इतकेच नव्हे, तर सातपुडा परिसरासाठी मेगा रिचार्ज योजना



आखून, तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांना संयुक्त हवाई पाहणी करण्यासाठी राजी करण्यात पाटील साहेबांनीच मोठी भूमिका बजावली होती.

।।निष्ठा आणि जनभावनेचा बुलंद आवाज।।

सत्ता आणि पदं येतात आणि जातात, ऋतुमानाप्रमाणे चेहरे बदलतात. पण जे कालच्या कठीण संघर्षात, सत्तेची कोणतीही शाश्वती नसताना तहान-भूक विसरून नेतृत्वासाठी आणि मतदारसंघासाठी ढाल बनून उभे राहिले, तेच आजच्या वैभवाचे खरे शिल्पकार आहेत. आयाराम हे सत्तेचे प्रवासी असतात, पण व्ही. डी. पाटील साहेबांसारखे एकनिष्ठ हे जन्मांतराचे सोबती असतात. मंत्री महोदयांनी आपल्या या जुन्या, हक्काच्या शिलेदाराला आता मोठी संधी देऊन न्याय द्यावा, हीच जामनेरकरांची आण आहे!

३. आयाराम तात्पुरते, एकनिष्ठच कायमचे: भाऊंना जामनेरकरांचा साद आज सत्तेचा सुवर्णकाळ आल्यानंतर तालुक्यात आणि जिल्ह्यात अनेक 'आयाराम-गयाराम' लोकांचा मोठा गराडा आणि शक्तीप्रदर्शने पाहायला मिळतात. पण भाऊ, हे आयाराम केवळ सत्तेचे सोबती असतात; सत्तेचा वारा बदलला की हे लोक सर्वात आधी पळ काढतील, यात शंका नाही. पण व्ही. डी. पाटील साहेबांसारखा माणूस, ज्याने शासकीय सेवेत असताना आणि सेवानिवृत्तीनंतरही कधीही स्वतःचा स्वार्थ न पाहता, केवळ मंत्री महोदयांचे हात बळकट करण्यासाठी आणि समाजासाठी आपल्या बुद्धीचे व रक्ताचे पाणी केले, तोच तुमचा खरा एकनिष्ठ आहे. सेवानिवृत्तीनंतरही पाटील साहेब घरी शांत न बसता अहोरात्र तरुणांना मार्गदर्शन करणे, सामाजिक प्रश्नांवर सक्रिय भूमिका घेणे आणि समाजकार्यात स्वतःला झोकून देत आहेत, ज्यामध्ये त्यांच्या पत्नी सौ. भारतीताई पाटील यांचीही मोठी साथ लाभत आहे.

४. जामनेरकरांची नम्र मागणी: पाटील साहेबांना मोठे पद मिळावे! अशा या अत्यंत कार्यक्षम, अभ्यासू आणि प्रामाणिक नेत्याच्या प्रदीर्घ अनुभवाचा फायदा आता थेट राज्य सरकारला मिळायला हवा. जामनेर तालुक्याची लाडके मंत्री महोदयांकडे हीच नम्र अपेक्षा आणि आग्रहाची मागणी आहे की, व्ही. डी. पाटील साहेबांच्या या अथांग अनुभवाचा, त्यांच्या कायदेशीर व प्रशासकीय कौशल्याचा आणि माहिती आयुक्त पदाच्या अनुभवाचा विचार करून, त्यांना राज्य किंवा केंद्र स्तरावरील एखाद्या महत्त्वाच्या महामंडळावर, सल्लागार समितीवर किंवा मोठ्या पदावर तात्काळ संधी देण्यात यावी. निष्ठावंताला मिळालेले हे पद केवळ पाटील साहेबांचा सन्मान नसेल, तर ते जामनेर तालुक्यासाठी तहान-भूक विसरून रात्रंदिवस प्रामाणिकपणे राबणाऱ्या प्रत्येक मूळ कार्यकर्त्याच्या कष्टाचा आणि निष्ठेचा सर्वोच्च गौरव ठरेल!

।। एकनिष्ठांचा सन्मान,
हीच जामनेरची ओळख ।।

आपल्या अमोघ कर्तृत्वाने हजारो शेतकऱ्यांच्या आयुष्यात पाणी आणणाऱ्या, प्रशासनाचा आदर्श निर्माण करणाऱ्या सन्माननीय श्री. व्ही. डी. पाटील साहेब यांच्या अनुभवाचा लाभ संपूर्ण महाराष्ट्राला मिळण्यासाठी मंत्री महोदय त्यांना लवकरच एका मोठ्या पदाची जबाबदारी देऊन कृतज्ञता व्यक्त करतील, हाच संपूर्ण जामनेर तालुक्याला ठाम विश्वास आहे!

**– शुभेच्छुक: संपादक सदाशिव इंगळे,**
**तहान-भूक विसरून सदैव पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे आपले जुने, निष्ठावंत कार्यकर्ते, आणि समस्त जामनेरकर जनता.**




# जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे १८ मे रोजी आयोजन

जळगाव (जिमाका)- जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन येत्या सोमवार १८ मे रोजी जिल्हाधिकारी यांच्या दालनात सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी ऋषिकेश काळे यांनी दिली आहे.

समस्याग्रस्त व पिडीत महिलांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे. तसेच त्यांच्या हक्काचे संरक्षण होवून त्यांना न्याय मिळावा. या दृष्टीने महिलांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी व समाजातील पिडीत महिलांना मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी.


यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून महिला लोकशाही दिन जिल्हा स्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी राबविण्यात येतो.

त्यानुसार १८ मे रोजी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी

माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.



मंत्री गिरीश महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष जामनेर पूर्व मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. समाजहिताच्या या उपक्रमात युवकांसह सर्व स्तरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. यावेळी जिल्हाध्यक्ष श्री. चंद्रकांत बाविस्कर, जामनेर पूर्व मंडळाचे अध्यक्ष श्री. मयूर पाटील यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




# मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते कुंभमेळा २०२७ च्या 'लोगो'चे अनावरण; पुण्याच्या सुमित काटे यांचे डिझाइन अव्वल

मुंबई : नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण आज सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विविध आखाड्यांचे साधू-संत, मंत्रीमंडळातील सदस्य आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या बोधचिन्हासाठी कुंभमेळा प्राधिकरणाच्या वतीने देशव्यापी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत देश-विदेशातील ३ हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. यामधून निवड झालेल्या उत्कृष्ट तीन स्पर्धकांचा यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.


स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या पुण्यातील सुमित काटे यांना तीन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. द्वितीय क्रमांकासाठी नोएडा येथील मयांक नायक यांना दोन लाख रुपयांचा धनादेश व सन्मानचिन्ह देण्यात आले, तर तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या पंढरपूर येथील पीयूष पिंपळनेरकर यांना एक लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.




या स्पर्धेतील प्रवेशिकांचे परीक्षण प्रसिद्ध डिझाइन तज्ज्ञांच्या समितीने केले. यामध्ये प्रसून जोशी , अश्विनी देशपांडे , मंदार राणे, वृषाली केकणे (देशमुख), बारिश दाते, विनय नारंग, डॉ. प्राजक्ता बास्ते, प्रफुल्ल सावंत, डॉ. दिनेश वैद्य, अँथनी लोपेझ आणि डॉ. किरण शिंदे यांचा समावेश होता. सर्जनशीलता, नाविन्य, ब्रँड सुसंगतता आणि प्रभावी सादरीकरण या निकषांवर आधारित अंतिम बोधचिन्हाची निवड करण्यात आली.


कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंग यांनी प्रास्ताविकातून कुंभमेळा आयोजनाची माहिती दिली. कार्यक्रमाला कुंभमेळा मंत्री गिरिश महाजन , अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ , शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.


नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याचे हे बोधचिन्ह नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या धार्मिक परंपरा व सांस्कृतिक वारशाचे प्रतीक म्हणून साकारण्यात आले आहे. या बोधचिन्हामध्ये भगवान शंकराचे त्रिशूळ, त्र्यंबकेश्वर मंदिराची प्रतिकृती, काळाराम मंदिराची कमान आणि गोदावरी नदीचा समावेश करण्यात आला आहे. गोदावरी नदीला 'शिवलिंग' स्वरूपात दर्शवून कुंभमेळ्यातील पवित्र स्नान परंपरेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे.नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, मायगव्ह आणि असोसिएशन ऑफ डिझाइनर्स ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. २० नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत मायगव्ह प्लॅटफॉर्मवर पार पडलेल्या या स्पर्धेत ७० आंतरराष्ट्रीय स्पर्धकांसह एकूण ३,०६७ प्रवेशिका प्राप्त झाल्या. महाराष्ट्रातून सर्वाधिक सहभाग नोंदविण्यात आला असून, १८ ते २४ वयोगटातील तरुणांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.











दैनिक

# जळगाव प्रहार

लेखणीच्या टोकाला सत्याची धार

दि. १७ मे २०२६

४



खुश खबर खुश खबर ...! वाढदिवस जाहिरात

आपला, कुटूंबातील सदस्यांचा, लग्नाचा वाढदिवसानिमित्त आपला फोटो येथे प्रसिद्ध करा

शुभेच्छुक

रंगीत जाहिरात फक्त = २५० रु. कृष्णधवल जाहिरात फक्त = १५० रु. (२ X १० आकारात) संपर्क मो.९७३०५७०९०६





-शुभेच्छूक-



भोजराज पुंशी
संत सतरामदास इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.
चाळीसगांव




-शुभेच्छूक-

सप्तश्रृंगी इन्फ्रास्ट्रक्चर, जामनेर




-शुभेच्छूक-

एल एच पाटील कन्स्ट्रक्शन जळगांव





-शुभेच्छूक-



अभिषेक कौल
गर्व्हमेंट कॉंट्रक्टर,
जळगाव




-शुभेच्छूक-



संजय शांताराम पाटील
एस.एस.पाटील कन्स्ट्रक्शन प्रा.लि.,पाचोरा




-शुभेच्छूक-



दिपक भामरे
सुंदरमाधव कन्स्ट्रक्शन
धुळे




-शुभेच्छूक-



सचिन राधेश्याम पाटील (डायरेक्टर)



चिंतन रविकांत जैन (डायरेक्टर)

श्री बलसाना रिअल इस्टेट प्रा.लि.




-शुभेच्छूक-



जयेश पाटील
अभिषेक कन्स्ट्रक्शन



अशोक पाटील
एपीजे कन्स्ट्रक्शन




-शुभेच्छूक-



धनराज मोरे
गर्व्हमेंट कॉन्ट्रक्टर, जामनेर
मो.९९२१२३२८४९
८६००८३३०३०




-शुभेच्छूक-

बी.एन.अग्रवाल इन्फ्रा प्रा.लि.भुसावळ




-शुभेच्छूक-

प्रशांत महाजन,विशाल महाजन गर्व्हमेंट कॉंट्रक्टर, जामनेर




-शुभेच्छूक-



राजेंद्र हरी पाटील
तुलसी कन्स्ट्रक्शन, जामनेर



भूषण राजेंद्र पाटील
तुलसी इन्फ्रास्ट्रक्चर, जामनेर